दाखल दिनांक : ०२/०१/२०१८.
नोंदणी दिनांक : ०२/०१/२०१८.
पारित दिनांक : ०२/०३/२०२०.
कालावधी: ०२व. ०२म. ००दि.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, वणी, जि. यवतमाळ यांच्या न्यायालयात**
**{पिठासीन अधिकारी के.के. चाफले}**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१/२०१८.** **नि.क्र.३०.**
CNR-MHYA210000182018

**अर्जदार :**
सौ. सिंधुबाई उर्फ सुधाबाई लक्ष्मण महाजन
वय – ६७ वर्ष, धंदा – काहीही नाही,
रा. द्वारा गजानन ताटे यांचे घरी,
नांदेपेरा रोड, वणी,
ता. वणी, जि. यवतमाळ.

**–// विरुध्द //–**

**गैरअर्जदार.**
लक्ष्मण बापुराव महाजन
वय – ७० वर्ष, धंदा – शेती,
रा. चिंचमंडळ, पो. चिंचमंडळ,
ता. मारेगांव, जि. यवतमाळ.

---

उपस्थिती :–
श्री. एन.बी. चंदने, अधिवक्ता अर्जदारातर्फे.
श्री. डी.एम. खोके, अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे.

---

## न्यायनिर्णय
**(घोषित दिनांक ०२ मार्च, २०२०)**

सदरचा अर्ज अर्जदाराने गैरअर्जदाराकडून दरमहा मासीक पोटगी मिळण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५(१) नुसार दाखल केला.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, सन १९७० साली तिचे लग्न गैरअर्जदारासोबत मौजा डोंगरगांव येथे संपन्न झाले असून ती गैरअर्जदाराकडे नांदायला गेली असता काही दिवस तिला चांगले नांदवून नंतर शुल्लक कारणावरुन वाद करुन तिचा दोष नसतांनाही तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करित होते. तिच्या माहेरची परिस्थिती गरीबीची व

हलाकीची असल्याने तिने निमुटपणे सर्व त्रास सहन करुन संसार करित होती, अशातच तिला चार मुल झाली. तरीदेखील गैरअर्जदाराचा त्रास कमी झाला नाही व गैरअर्जदाराने तिला अपमानीत करुन मारहाण करुन साधारण मागील तीस–एकतीस वर्षापुर्वी कुठलेही कारण नसतांना दोन मुले नामे रमेश व खुशाल यांचेसह घरातून हाकलून दिले व धमकी दिली की, ''तू घरात पाय ठेवशील तर रॉकेल टाकून पेटवून देईल''. ज्यामुळे तिने तिच्या वडीलांना बोलावून घेतले असता तिच्या वडीलांनीदेखील समजूत घातली. तरीही गैरअर्जदाराने काहीही न ऐकता तिच्या वडीलांना शिवीगाळ करुन त्यांना घराबाहेर काढून दिले. ज्यामुळे नाईलाजास्तव ती दोन्हीही मुलांना घेवून कसेबसे माहेरी जिवन जगत होती. तिने कसेबसे मुलांना मोठे करुन त्यांचे लग्न लावून दिले. परंतु त्यानंतर दोन्हीही मुलांनी तिच्याकडे दुर्लक्ष करुन तिचा सांभाळ केला नाही व ती आता वयोवृद्ध असून तिच्याने कोणताही कामधंदा होत नाही. याउलट गैरअर्जदार पतिकडे मौजा धानोरा येथे ९–१० एकर ओलीताची शेती असून खर्च वजाजाता सहा–सात लाख रुपये उत्पन्न होते. त्यामुळे गैरअर्जदाराची आर्थिक ऐपत चांगली आहे. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराकडून मासीक पोटगी मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. गैरअर्जदार याने निशाणी क्र.१० वर त्याचा लेखी जवाब दाखल करुन अर्जातील नमूद मागणी अमान्य केली. गैरअर्जदाराने असेही नमूद केले की, लग्नानंतर अर्जदार काही दिवस चांगली वागली व त्यानंतर शुल्लक कारणावरुन कुटुंबाशी वाद करु लागली, तरीदेखील तिच्या वागण्यात आज ना उद्या बदल होईल या हेतुने त्या वागणुकीवर लक्ष दिले नाही, परंतु तिच्या वागणुकीत कोणताही बदल झाला नाही. त्याने असेही नमूद केले की, अर्जदार ही तिच्या आई–वडीलांची मोठी मुलगी असून ती कोणत्याही कारणाविना माहेरी आई–वडीलांकडे जावून रहात होती व अशीच मागील तीस ते पस्तीस वर्षाअगोदर कोणतेही कारण नसतांना त्याचा त्याग करुन दोन मुलांना घेवून माहेरी निघून गेली व तिला नांदण्यास येण्याबाबत वेळोवेळी विनंती केली असता ती नांदायला आली नाही व स्वमर्जीने माहेरी राहू लागली. त्याने पुढे असेही नमूद केले की, अर्जदार हिच्याविना त्याने दोन्हीही मुलांचा सांभाळ केला व त्यांना आपल्या अल्पश्या उत्पन्नात मोठे केले, तरीदेखील तिने नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने स्वत:चे उदरनिर्वाह करण्याची शेती उत्पन्नातून पुरेशी ऐपत असतांनादेखील त्याच्याविरुद्ध खोटा दावा दाखल करुन सदरचा खोटा अर्ज केला. सबब, अर्जदाराने दाखल केलेला सदर अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

४. अर्जदार सिंधुताई उर्फ सुधाबाई लक्ष्मण महाजन (सा.क.१) हिने अर्जातील मागणीच्या पुष्ट्यर्थ स्वत:ची साक्ष शपथपत्र निशाणी क्र.११ नुसार सादर करुन तिच्या बाजुने साक्षीदार म्हणून गजानन मधुकरराव ताठे (सा.क.२) याची साक्ष निशाणी क्र.१८ वरिल शपथपत्रान्वये सादर केली व कागदोपत्री पुरावा म्हणून मौजा धानोरा, ता. मारेगांव येथील शेत गट नं.१७/१ च्या सातबारा उता—याची प्रत निशाणी क्र.१२ दाखल करुन त्याचा आधार घेतला. अर्जदाराने पुरसीस निशाणी क्र. १९ अन्वये तिचा पुरावा बंद केला.

५. याउलट गैरअर्जदार लक्ष्मण बापुराव महाजन याने त्याची साक्ष निशाणी क्र.२२ वरिल शपथपत्रान्वये सादर केली व कागदोपत्री पुरावा म्हणून मौजा डोंगरगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथील शेत गट क्र.२४/१ गाव नमुना सात व गांव नमुना ८—अ अनुक्रमे निशाणी क्र.१६ व १७, अर्जदार हिचे रहिवासी दाखले निशाणी क्र.२३ ते २५ व नियमीत दिवाणी दावा क्र. ७/२०१८ च्या दाव्याची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२६ दाखल करुन त्यांचा आधार घेतला. गैरअर्जदाराने पुरसीस निशाणी क्र.२९ अन्वये त्याचा पुरावा बंद केला.

६. अर्जदारातर्फे त्यांचे विद्वान वकील श्री. चंदने व गैरअर्जदारातर्फे त्यांचे विद्वान वकील श्री. खोके यांचा युक्तीवाद ऐकून विचारत घेतला. तसेच दोन्हीही पक्षाने अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले.

७. अभिलेखावर आलेल्या दोन्हीही पक्षांचे विरोध कथन व पुराव्यावरुन माझे विवेचनार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात, ज्यास कारणमीमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| (१) अर्जदार असे सिद्ध करते काय की गैरअर्जदार याची ऐपत असूनदेखील तो तिचा सांभाळायला टाळाटाळ करतो? | ......नाही. |
| (२) अर्जदार असे सिद्ध करते काय की ती स्वत: आपली उपजिविका भागविण्यास असमर्थ आहे? | ......नाही. |
| (३) अंतिम आदेश काय? | अंतिम आदेशानुसार. |

## <u>कारणमिमांसा</u>

८. **<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत</u> :–** वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचे विवेचन एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

९. अर्जदाराने नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदार हा तिचा पति असून लग्नानंतर तिला कोणतेही कारण नसतांना शिवीगाळ, मारझोड करुन त्रास देत होता व ती आज ना उद्या चांगले दिवस येईल या आशेने नांदत होती, तरीदेखील चार मुले होवूनही गैरअर्जदाराच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही व त्याने मागील तीस ते एकतीस वर्षापुर्वी तिला मारझोड व शिवीगाळ करुन घरातून हाकलून दिले, ज्यामुळे ती वडीलांसह त्यांच्या आश्रयावर रहात होती. अर्जदर हिने असेही नमूद केले की, तिने कसेबसे मुलांना वाढवून त्यांचे लग्न करुन दिले व तेदेखील तिचा सांभाळ करित नाही त्यामुळे ती हलाखीचे जिवन जगत आहे व गैरअर्जदार तिच्या पतिकडे ९ ते १० एकर ओलीताची शेती असून खर्च वजाजाता सहा ते सात लाख रुपये उत्पन्न होत असून आर्थिक परिस्थिती चांगली असूनदेखील तिला कोणतीही आर्थिक मदत करित नाही व सांभाळण्यास टाळाटाळ करित आहे.

१०. अर्जदार सिंधुबाई उर्फ सुधाबाई (सा.क्र.१) हिने नमूद केलेल्या मागणीच्या पुष्ट्यर्थ स्वतःच्या साक्षीचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले असून अर्जातील नमूद संपुर्ण कथन शपथपत्रात नमूद केले व समर्थनार्थ साक्ष म्हणून साक्षीदार गजानन (सा.क्र.२) याची साक्ष शपथपत्र निशाणी क्र.१८ वर दाखल केली. गैरअर्जदाराने अर्जातील सर्व नमूद बाबी नाकारुन दोन्हीही साक्षीदारांचा उलट तपास घेवून त्यांच्या जबानीतल नमूद बाबीदेखील नाकारल्या व स्वतःची निशाणी क्र.२२ वर जबानी सादर केली, ज्यास अर्जदाराने उलट तपास घेतला.

११. अभिलेखावर उपलब्ध दोन्हीही पक्षांच्या कथनावरुन अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न सन १९७० साली मौजा डोंगरगांव येथे झाले व दोघांचे वैवाहीक संबंध अस्तित्वात असून त्यांना चार मुले आहेत, या बाबी अविवादीत आहेत. तसेच दोन्हीही पक्षांच्या कथनावरुन मागील साधारण तीस वर्षापुर्वीपासून अर्जदार ही आपल्या माहेरी रहात आहे ही देखील अविवादीत बाब आहे. दोन्हीही पक्षांमधे वादाचा विषय असा आहे की, अर्जदार हिला माहेरी राहण्यास गैरअर्जदाराने दिलेल्या तथाकथीत छळाचा आधार आहे किंवा ती स्वमर्जीने माहेरी रहात आहे.

१२. अभिलेखावर सादर साक्षपुराव्याच्या अवलोकनार्थ असे दिसून येते की, गैरअर्जदार हा मौजा चिंचमंडळ, ता. मारेगांव येथे रहात असून त्याच्याविरुद्ध अर्जदार, तिचे दोन मुले नामे रमेश व खुशाल यांनी दिवाणी दावा दाखल केला आहे. सदरहू प्रकरणात गैरअर्जदाराने असा आक्षेप नोंदविला की, अर्जदार ही या न्यायालयाच्या स्थळसीमेत रहात नसून सदरचा अर्ज हा तिने केवळ त्याला परेशान करण्याकरिता दाखल केला. गैरअर्जदाराने सदर आक्षेपाच्या पुष्ट्यर्थ अर्जदार ही ग्रामपंचायत किन्हाळा हद्दीतील मौजा डोंगरगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथे रहात असल्याबाबत तिचे रहिवासी दाखले निशाणी क्र.२३ ते २५ दाखल करुन तिने मुलांसह दाखल केलेला नियमीत दिवाणी दावा क्र.७/२०१८ (रमेश लक्ष्मण महाजन +२ वि. लक्ष्मण बापुराव महाजन +३) याच्या वादपत्राची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२६ दाखल करुन त्याचा आधार घेतला. सदरहू कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ग्रामपंचायत किन्हाळाचे सरपंच व सचिव यांनी रहिवासी दाखले अनुक्रमे निशाणी क्र.२३ व २५ अन्वये अर्जदार सिंधुताई लक्ष्मण महाजन ही मौजा डोंगरगांव येथे कायमस्वरुपी रहिवासी असल्याबाबत प्रमाणपत्र निर्गमीत केले असून मौजा डोंगरगांव येथील पोलीस पाटील यांनीदेखील रहिवासी दाखला निशाणी क्र.२४ अन्वये सदरहू अर्जदार ही मौजा डोंगरगांव येथील कायमस्वरुपी रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र निर्गमीत केले. एवढेच नव्हेतर अर्जदार ही वादी म्हणून पक्षकार असलेली वादपत्राची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२६ वरुन तिचा रहिवासी पत्ता हा डोंगरगांव, पो. मार्डी, ता. मारेगांव, जि. यवतमाळ हाच दिसून येतो.

१३. या क्षणी असे नमूद करणे आवश्यक आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२६ नुसार अर्जदार स्त्री हिला तिच्या पतिविरुद्ध कलम १२५(१) नुसार अर्ज करावयाचा असल्यास तिचे पति जेथे असेल किंवा जेथे तो इसम किंवा जेथे त्याची पत्नी रहात असेल किंवा जेथे दोघेही रहात असेल त्या ठिकाणी अर्ज दाखल करता येतो.

१४. सदर मामल्यात अर्जदार सिंधुताई उर्फ सुधाबाई (सा.क.१) हिने तिच्या अर्जात व साक्ष शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे सध्या गजानन ताठे यांचे घरी नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ येथे रहात आहे व तसाच तिने तो पत्ता तिच्या अर्जात नमूद केला, ज्याबाबत गैरअर्जदाराने तिला उलट तपासात प्रश्नदेखील विचारले. अर्जदार हिने सदर मामल्यात साक्षीदार गजानन (सा.क.२) याची जबानी शपथपत्र निशाणी क्र.१८ वर सादर करुन ती सध्या त्याच्याकडे रहात

असल्याचा साक्षपुरावा सादर केला, ज्यास गैरअर्जदारानेदेखील उलट तपास घेतला. सदरहू साक्षीदार गजानन (सा.क.२) याने त्याच्या जबानीत नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिचे मुले तिचा सांभाळ करित नसल्याने ती माहे ऑगस्ट २०१८ पासून त्याच्या घरी मौजा वणी येथे रहात आहे, ज्यास गैरअर्जदाराने उलट तपासणीत नाकारले.

१५. उपलब्ध साक्षपुराव्याचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, अर्जदार हिने तिच्या अर्जात व निशाणी क्र.११ वरिल साक्ष शपथपत्रात तिचा सध्या राहण्याचा पत्ता हा गजानन ताठे यांच्या घरी नांदेपेरा रोड, वणी असे नमूद केले. परंतु, तिच्या जबानीत ती कधीपासून त्यांच्याकडे रहात आहे व तेथे राहण्यास कोणते कारण उद्‌भवले याबाबत कोणतेही कारण नमूद केले नाही. असे स्पष्ट कथन नसतांनादेखील अर्जदाराचा साक्षीदार गजानन (सा.क.२) याने त्याच्या जबानीत अर्जदार ही त्याच्याकडे माहे ऑगस्ट २०१८ पासून रहात असल्याचे नमूद केले. अर्जदार हिने मारेगांव येथील न्यायालयात नियमीत दिवाणी दावा क्र.७/२०१८ हा दाखल करतेवेळेस तिने तिचा राहण्याचा पत्ता डोंगरगांव, पो. मार्डी, ता. मारेगांव असा नमूद केल्याचे वादपत्राच्या प्रमाणीत प्रती (निशाणी क्र.२६) वरुन दिसून येते. एवढेच नव्हेतर अर्जदार ही साक्षीदार गजानन (सा.क.२) याच्याकडे माहे ऑगस्ट २०१८ पासून रहात आहे असे असेल तर मग दि.०२.०१.२०१८ रोजी सदरचा अर्ज दाखल करतेवेळेस अर्जदार हिने ती साक्षीदार गजानन (सा.क.२) यांच्या घरी रहात असल्याचे कसे काय नमूद केले. याविरुद्ध त्याच महिन्यात (दि.३१.०१.२०१८ रोजी) मारेगांव येथे दाखल केलेल्या निशाणी क्र.२६ वरिल वादपत्रात तिने तिचा पत्ता रा. डोंगरगांव, पो. मार्डी, ता. मारेगांव, जि. यवतमाळ असे मग का नमूद केले. यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, सदरचा अर्ज या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात दाखल करण्याकरिताच अर्जदार ही मौजे डोंगरगांव, ता. मारेगांव येथे रहात असतांना ती दि.०२.०१.२०१८ रोजी साक्षीदार गजानन (सा.क.२) याच्या घरी हल्ली मुक्कामी रहात असल्याचे नमूद करुन अर्ज दाखल केला, ज्यास साक्षीदार गजानन (सा.क.२) याने समर्थनार्थ साक्ष नोंदविली नाही च तर त्याच्याकडे माहे ऑगस्ट २०१८ पासून रहात आहे असे नमूद केले.

१६. दोन्हीही पक्षांमधे अविवादीत बाब की मागील साधारण तीस वर्षापासून दोघेही वेगवेगळ रहातात. अर्जदार हिने त्याकरिता असे कारण नमूद केले की, तिला गैरअर्जदार याने

शिवीगाळ, मारहाण व छळ करुन हाकलून दिले, ज्यामुळे ती माहेरी रहात आहे. याउलट गैरअर्जदार याने असे नमूद केले की, अर्जदार ही आई—वडीलांची लाडकी मोठी मुलगी असून कोणतेही कारण नसतांना ती माहेरी गेली व स्वमर्जीने तेथेच कोणतेही कारण नसतांना रहात आहे.

१७. दोन्हीही पक्षांच्या साक्षपुराव्यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, अर्जदार ही तीनही बहीणींमधे मोठी आहे व तिचे आई—वडील दगावल्यावर तिला मौजा डोंगरगांव, ता. मारेगांव येथील शेत गट न.२४/१ मिळाली. सदर बाबीच्या समर्थनार्थ गैरअर्जदाराने शेत गट नं.२४/१ चा सातबारा उतारा (निशाणी क्र.१६) व ८—अ उतारा (निशाणी क्र.१७) दाखल केला, ज्यावरुन सदरहू शेतजमीन ही अर्जदार हिच्या एकटीच्या नावे दिसून येते. सादर साक्षपुराव्यात गैरअर्जदाराने अंदाजे चाळीस वर्षापासून अर्जदार ही माहेरी गेल्याने तो सासरी गेला नाही असे नमूद केले. यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार ही माहेरी गेल्यावर गैरअर्जदार हा त्याच्या सासरी तिला पहायला गेला नाही, ज्यामुळे त्याला तिच्याबाबत प्रत्यक्ष माहिती नाही.

१८. सादर साक्षपुराव्यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, अर्जदार हिने तिच्या जबानीत नमूद केलेल्या छळाबाबत तिने सदरहू अर्जाव्यतिरिक्त कोणतीही तक्रार केली नाही. जरी तशी तक्रार करणे आवश्यक नसले तरीदेखील ज्या कारणाने अर्जदार हिला गैरअर्जदार पतिपासून दोन मुलांना घेवून वेगळे रहावे लागले त्याकरिता तिने कुठेही त्याबाबत उजर केला नसून झालेल्या तथाकथीत छळाबाबत कुठेही तक्रार न करणे ही बाब विचार करणारी आहे. गैरअर्जदार याने नमूद केलेली बाब की, ती स्वतःच कोणतेही कारण नसतांना स्वमर्जीने माहेरी जावून रहात आहे ही बाब विचारात घेता त्यात अल्पशः तथ्य दिसून येतो. सदरचे तथ्य सादर साक्षपुराव्यातून प्रबळ होते की, अर्जदार हिने सलग तीस वर्ष गैरअर्जदार पतिकडे कोणतीही मागणी केली नसून केवळ तिने मुलांसह दावा (निशाणी क्र.२६) दाखल केल्यानंतरच सदरचा अर्ज दाखल करुन आर्थिक मदत मिळण्याची विनंती करते. अभिलेखावर आलेली सर्व परिस्थिती विचारात घेता माझे असे स्पष्ट मत होते की, अर्जदार ही गैरअर्जदार याच्या परस्पर संमतीने वेगळी रहात असून ती पुरेसे कारण नसतांना गैरअर्जदार पतिपासून विभक्त रहात आहे व त्याच्यासह राहण्यास तिचा नकार आहे. त्यामुळेच दोन्हीही पक्षांनी एकमेकांविरुद्ध मागील तीस वर्षापासून कोणत्याही तक्रारी व उजर केला नसून वेगळे रहात असल्याबाबत कोणताही न्यायालयीन वाद दाखल केला नाही.

१९. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५(४) नुसार कोणतीही विवाहीत स्त्री पुरेसे कारण नसतांना परस्पर संमतीने पतिपासून विभक्त रहात असेल किंवा कोणतेही पुरेसे कारण नसतांना पतिसोबत राहण्यास नकार देत असेल तर आपल्या पतिकडून निर्वाहसाठीचा भत्ता मिळण्यास हक्कदार राहणार नाही.

२०. अभिलेखावर उपलब्ध साक्षपुराव्याचे वरिलप्रमाणे विवेचनार्थ असे स्पष्ट दिसून आले की, अर्जदार ही मौजा डोंगरगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथील रहिवासी असून तिने सदरचा अर्ज दाखल करण्याकरिता साक्षीदार गजानन (सा.क.२) याच्या घरी हल्ली मुक्कामी रहात असल्याचे दि.०२.०१.२०१८ रोजी अर्जाच्या तारखेच्या दिवशी नमूद केले, परंतु साक्षीदार गजानन (सा.क.२) याने त्याच्या जबानीत अर्जदार ही त्याच्याकडे माहे ऑगस्ट २०१८ पासून रहात असल्याचे नमूद केले. ज्यावरुन अर्जदार ही अर्जाची तारीख दि.०२.०१.२०१८ रोजी या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात हल्ली मुक्कामी नमूद केल्याप्रमाणे रहात नव्हती. त्यामुळे सदरहू अर्ज हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेर असल्याने चालण्याजोगा नाही. याव्यतिरिक्त साक्षपुराव्याचे विवेचनार्थ असेही दिसून आले की, अर्जदार ही मागील तीसपेक्षा जास्त वर्षांपासून गैरअर्जदारापासून पुरेसे कारण नसतांना वेगळी रहात असून दोघेही परस्पर वेगवेगळे रहातात. ज्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५(४) नुसार अर्जदार ही सदरहू अर्जान्वये केलेली मागणी मंजूर होण्यास पात्र नाही.

२१. वरिल विवेचनार्थ, अर्जदार हिचे स्वत: उदरर्निर्वाह करण्याची ऐपत नसतांना गैरअर्जदार तिचा पति याची पुरेशी ऐपत असूनदेखील कोणतेही कारण नसतांना तिचा सांभाळ करण्यास टाळाटाळ करित आहे असे अर्जदार हिने स्वीकारण्यायोग्य पुराव्यानिशी साबीत केले नाही. सबब, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तरार्थ मी माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

: **<u>आदेश</u>** :

{१} सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

Digitally signed by Kailash Kisanrao Chafale
Date: 2020.03.03 15:13:37 +0530

(के.के. चाफले)
न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी), वणी.

दिनांक : ०२.०३.२०२०.